# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

"उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३


क्र.मऔविम/म.व्य(भूमी)/ B50849 दिनांक : ०१/०७/२०२०

## परिपत्रक

विषय :-**कोरोना विषाणूंचा(Covid-१९) चा वाढता प्रादुर्भाव विचारात घेता उद्योजकांना विविध शुल्क भरण्याकरीता विलंबशुल्क न आकारता कालावधी वाढविणे तसेच विनाशुल्क मुदतवाढ मंजूर करणेबाबत.**

दिनांक २४.०३.२०२० रोजी मा. पंतप्रधान यांनी संपूर्ण भारतात कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून Lockdown करणेकामी सूचना दिलेल्या आहेत. त्या अनुषंगाने राज्य शासनाच्या महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन व मदत पुर्नवसन विभागाने त्यांचेकडील अधिसूचना क्र. डीएमयु/२०२०/सीआर.९२/आ.व्य-१ दिनांक २५.०३.२०२० अन्वये संपूर्ण महाराष्ट्र राज्य २१ दिवसांकरीता म्हणजेच दिनांक १४.०४.२०२० पर्यन्त बंद करणेबाबत निर्णय घेतला तसेच तदनंतर सदरहू कालावधी कोरोना विषाणूंचा(Covid-१९) चा वाढता प्रादुर्भाव विचारात घेता दिनांक ०३.०५.२०२० व तदनंतर दिनांक १७.०५.२०२० पर्यन्त वाढविण्यात आला आहे व कालांतराने कोरोना विषाणूंचा(Covid-१९) प्रार्दुभाव विचारात घेता ३० जून २०२० पर्यन्त Lockdown चा कालावधी वाढविण्यात आला आहे.

सदरहू Lockdown मुळे महाराष्ट्र राज्यामध्ये सर्व खाजगी कार्यालये दिनांक २२.०३.२०२० पासून पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला तसेच शासकीय/निमशासकीय कार्यालयामध्ये सुध्दा उपस्थिती नियंत्रणात आणण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ अंतर्गत विहित करण्यात आलेल्या एमआयडीसी डिस्पोजल ऑफ लॅड रेग्युलेशन, १९७५ मधील तरतुदीस अनुसरुन महामंडळ औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांना भूखंड वाटप तसेच त्यासंबंधित विविध सेवा पुरवित असते. महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार सदरहू सेवा पुरविताना विविध प्रकारचे शुल्क उदा. प्रिमियम रककम, हस्तांतर शुल्क, अतिरिक्त प्रिमियम, पोटभाडे शुल्क इत्यादि शुल्क दिलेल्या कालावधीमध्ये भरल्यानंतर उद्योजकांना संबंधित सेवेस परवानगी देण्यात येत असते. परंतु दिलेल्या कालावधी मध्ये जर उद्योजकांने शुल्क भरले नाही तर प्रचलित नियमानुसार विलंबशुल्क आकारण्यात येते.

तथापि, कोरोना विषाणूंचा(Covid-१९) चा वाढता प्रादुर्भाव विचारात घेता महाराष्ट्र राज्यामधील सर्व उद्योग २२ मार्च, २०२० पासून बंद असल्यामुळे, उद्योगांचे आर्थिक व्यवहार ठप्प असल्यामुळे तसेच उद्योजक भूखंडावर विकास करु शकत नसल्याने, उद्योगातील अडचणी कमी करण्यासाठी उद्योजकांना खालीलप्रमाणे मुभा/सुट देण्यात येत आहेत.

१) ज्या उद्योजकांची, महामंडळाच्या मागणीनुसार देय शुल्क भरणेची अंतिम तारीख लॉकडाऊनच्या कालावधीमध्ये येत आहे अशा उद्योजकांचा देय शुल्क भरण्याचा कालावधी विलंबशुल्क न आकारता दिनांक ३० सप्टेंबर पर्यन्त वाढविण्यात यावा.

२) ज्या उद्योजकांची देय शुल्क भरणेची अंतीम तारीख लॉकडाऊनच्या पूर्वीची संपलेली असेल तर अशा प्रकरणात लॉकडाऊडन चालू होण्यापूर्वीच्या कालावधीपर्यन्त महामंडळाच्या नियमानुसार विलंबशुल्क आकारण्यात यावे तथापि लॉकडाऊनच्या कालावधीत विलंबशुल्क न आकारता देय शुल्क भरण्याचा कालावधी दिनांक ३० सप्टेंबर पर्यन्त वाढविण्यात यावा.

३) ज्या उद्योजकांना देकारपत्र, वाटपपत्र देण्यात आले असून देकारपत्र/वाटपपत्रात नमूद EMD/BOP शुल्क भरणेची अंतिम तारीख लॉकडाऊनच्या कालावधीमध्ये येत असेल तर अशा उद्योजकांचा देय शुल्क भरण्याचा कालावधी विलंबशुल्क न आकारता दिनांक ३० सप्टेबर पर्यन्त वाढविण्यात यावा.

४) ज्या उद्योजकांनी विलंबशुल्कासह देय रक्कम भरलेले आहे, अशा उद्योजकांना त्यांनी भरलेली रक्कम परत करण्यात येवू नये किंवा समायोजित करण्यात येवू नये.

५) ज्या भूखंडांचा विकास कालावधी/वाढीव विकास कालावधी लॉकडाऊन मध्ये संपलेला आहे अशा भूखंडांना, महामंडळाच्या दिनांक ०६.०३.२०१३ च्या परिपत्रकातील ब) सुधारित मुदतवाढ धोरण मधील अ.क्र. ३ नुसार **अपवादात्मक परिस्थितीत** ३० सप्टेंबर २०२० पर्यन्त भूखंडाचा विकास कालावधी/वाढीव विकास कालावधी संपलेल्या दिनांकापासून कोणतीही अतिरिक्त प्रिमियम न आकारता ३० सप्टेंबर २०२० पर्यन्त वाढविण्यात यावा.

६) भूखंडाचा विकास कालावधी/वाढीव विकास कालावधी वाढविण्याचा अधिकार संबंधित प्रादेशिक अधिकारी यांना राहतील.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

**(अविनाश सुभेदार)**
**सह मुख्य कार्यकारी अधिकारी(प्रशासन)**
**मऔविम, मुंबई.**

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.

८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई